## एक खांदा हवाय

खांदा हवाय एक
कधी डोळ्यांच्या ओल्या कडा लपवायला,
कधी महापुराचे पाणी अडवायला,
कधी न उमटलेलं विसरायला,
कधी शब्दांची ओझी उचलायला,
कधी रागाच्या ज्वाळांवर माती टाकायला,
कधी संयमाचे विझलेले दिवे पेटवायला,
कधी अपमानाचे दगड झेलायला,
कधी आत्मस्तुतीची फुले पेलायला,
कधी मानभंगांचा पाचोळा गोळा करायला,
कधी स्वत्वाची रांगोळी काढायला,
खांदा म्हणजे टेकू नको,
नुसताच वाहायचा भार आणि नंतर तिरडीला आधार.
खांदा हवाय एक,
सहज ओलावणारा, त्यातूनच फुलणारा,
खूप फांद्यांचा, फळाफुलांनी बहरलेला,
रंगीबिरंगी छटांचा.
खांदा हवाय एक
तो ही सुकणारा, तो ही तुटणारा,
तो ही वाकणारा, तो ही ढासळणारा,
शिणलेल्या हातांचा.

**--- संध्या रानडे**